# इयत्ता दहावी [STD- X] मराठी (००९)

# द्वितीय सत्र नमुना उत्तर पत्रिका व आराखडा २०२१-२२

| प्रश्न | उपप्रश्न | अपेक्षित उत्तरे | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र.१ | | **खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** | |
| | **अ** | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा**. | 4 |
| | १. | वृक्षवल्ली अन्न, वस्त्र, औषधे, सावली देतात. घरासाठी फर्निचर वृक्षांपासून मिळते. प्राणवायू देतात, प्रदूषण कमी करतात, बुडणाऱ्या माणसाला वाचवू शकतात - अशा सर्व प्रकारे काळजी घेतात. | |
| | २. | वृक्ष सर्वप्रकारे उपयुक्त, त्यांच्यावर घाला घातल्यास मानवाला अन्न, वस्त्र याबरोबर प्राणवायू मिळू शकणार नाही. जमिनीची धूप होईल, पर्यावरणाचा समतोल बिघडेल, प्रदूषण वाढेल. जीवन धोक्यात येईल. | |
| | ३. | माणसे व झाडे एकमेकांवर अवलंबून आहेत. माणसांचा उच्छवास झाडांसाठी उपयुक्त तर झाडांनी सोडलेला प्राणवायू माणसांसाठी जीवन. झाडे हवेतील कार्बन शोषून प्रदूषण कमी करतात. मानवाला अन्न, वस्त्र, सावली, अशी मदत करतात. | |
| | **ब** | **खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाबद्दल तुमचे विचार व्यक्त करा**. | 3 |
| | १. | उपाय- विविध ठिकाणी वृक्ष लागवड व संगोपन करावे, रस्ता रुंदीकरणासाठी, इमारतींसाठी वृक्ष तोडताना आणि तेवढेच वृक्ष लावावेत. पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करावी. शक्य तेथे वृक्षतोड न करता त्यांच्यासोबत बांधकाम करावे. शक्य तेथे कागदाचा वापर कमी करावा. | |
| | २. | मानवी शरीरात हृदयाची महत्त्वाची जागा व कार्य, हृदयाशिवाय मानवी जीवन अशक्य. त्याच प्रकारे वृक्ष हे निसर्गाचे हृदय. वृक्ष सर्व पृथ्वीला सर्व प्रकारे उपयुक्त आहेत. त्यांना तोडणे म्हणजे शरीरातून हृदय काढून टाकणेच आहे. | |
| | | **टीप - मुलांनी स्वतःच्या शब्दांमध्ये, स्वतःच्या विचारांनी उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांचे विचार (सकारात्मक/नकारात्मक) ग्राह्य धरले जावेत.** | |
| **प्र.२.** | **अ.** | **खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा.( कोणतेही २)** | **4** |
| | १. | रघुनाथ माशेलकरांच्या आईला काँग्रेस हाऊसजवळ काम मिळू शकतं हे समजल्यावर ती तेथे बराच वेळ ताटकळत रांगेत उभी राहिली पण तेथे फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाणार असल्यामुळं आणि ती स्वतः तेवढी शिकलेली नसल्यामुळं तिला काम मिळू शकले नाही. | |
| | २. | कथा म्हणजेच गोष्ट.... आकर्षक सुरुवात, परिणामकारक शेवटी ही कथेची वैशिष्ट्ये.... परीकथा, बोधकथा, विज्ञान कथा, ऐतिहासिक कथा, साहसकथा हे तिचे प्रकार, नाटक, मालिका, चित्रपट यांचा पाया म्हणजेच कथा. वि.स. खांडेकर, विभावरी शिरुरकर, व्यंकटेश माडगूळकर, व.पु.काळे, शंकर पाटील, द.मा. मिरासदार असे कथालेखक प्रसिद्ध. | |
| | ३. | भडसावळे गुरुजींनी निरंजनचे थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. त्याच्या वह्या, पुस्तकांचा खर्च गुरुजी करायचे आणि निरंजनला त्यांनी 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर येतो तोपर्यंतच सर्व खर्च करीन आणि वारही लावून देईन' असे आव्हानही दिले होते. गुरुजी निरंजनला अभ्यास कसा करावा, केव्हा करावा असा योग्य सल्ला देत असत. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४. | प्रवासवर्णनाची वैशिष्ट्ये - एखाद्या ठिकाणी प्रवास करून आल्यानंतर प्रवासाची, प्रेक्षणीय ठिकाणांची रोचक, मुद्देसूद, जशीच्या तशी माहिति पोहचवणारे पुस्तक म्हणजे प्रवासवर्णन. घरात बसूनही दूरवरच्या गावांमध्ये, देश परदेशात फिरवून आणणारे ते प्रवास वर्णन. प्रवासवर्णनात प्रवासातील माहितीबरोबरच लेखकाचे स्वतःचे अनुभव, भावना, निसर्ग सौंदर्य, व्यक्तिविशेषही आढळतात. | |
| **प्र.२.** | **ब.** | **खालील प्रश्नांची सुमारे ५० ते ६० शब्दांत उत्तरे लिहा. ( कोणतेही २)** | **6** |
| | १. | प्रतिकूल परिस्थितीतून जिद्दीने शिक्षण घेणारे रघुनाथ माशेलकर आणि त्यांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या त्यांच्या आई आणि शिक्षकांबद्दलच्या माशेलकरांच्या भावना पाठात दिसून येतात. युनियन हायस्कुलमधल्या भावे सरांनी माशेलकरांना विज्ञानाची गोडी लावली. भिंगांच्या सहाय्याने सूर्यकिरणांची शक्ती दाखवणारा प्रयोग दाखवताना भावे सरांनी माशेलकरांना एकाग्रतेने, पूर्ण निश्चयाने एखादे काम केले तर कोणतीही गोष्ट अशक्य नसते, यश निश्चित मिळते हे जीवनाचे तत्वज्ञानच शिकवले. | |
| | २. | प्रस्तावना - रंग साहित्याचे- मराठी भाषा विविध साहित्य प्रकारांनी समृद्ध आहे, त्या साहित्य प्रकारांविषयीची माहिती या नाटुकलीमध्ये दिली आहे.<br>आपले विचार, भावभावना योग्य प्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्त्व हवे. विविध साहित्यप्रकारांच्या वाचनाने जीवनाचा अनुभव समृद्ध होतो. जितकं जास्त वाचन केलं जाईल तितकी भाषा, विचार, शब्दसमूह सुधारत जाईल आणि स्वतःचे लेखनही सुधारेल. शब्दसंपत्ती वाढेल म्हणून 'उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक होणे आवश्यक असते' असे म्हटले आहे. | |
| | ३. | आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये- हुशारीबरोबरच नम्रता, मोठ्यांना आदर देणारा, संस्कारी, चांगला मित्र, सद्वर्तनी, शिस्तप्रिय, इतरांच्या सुखदुःखात धावून जाणारा, सामाजिक बांधिलकी मानणारा, मानवतावादी मूल्य जपणारा, प्रसंगावधान राखून काम करणारा इ. | |
| | | **टीप - मुलांनी स्वतःच्या शब्दांमध्ये, स्वतःच्या विचारांनी उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांचे विचार (सकारात्मक/नकारात्मक) ग्राह्य धरले जावेत.** | |
| **प्र.३.** | **अ.** | **खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **4** |
| | १. | नवीन पिढीचे, नवीन युगाचे स्वप्न, देशाच्या उज्ज्वल भविष्याचे, मातीतून मोती पिकवण्याचे स्वप्न कवी पाहत आहे. नवनवीन यंत्रांच्या मदतीने देशाची प्रगती व्हावी, नवनवीन उद्ध्योगधंदे निर्माण व्हावेत. श्रमांना योग्य मान, प्रतिष्ठा मिळावी, भारताच्या उत्क्रांतीचा आवाज पूर्ण जगात घुमावा, सर्व भारतीयांनी एकत्र येऊन, एकजुटीने देशाला वैभव मिळवून द्यावे असे स्वप्न कवी पाहत आहेत.<br>कृषिप्रधान, श्रमप्रतिष्ठा मानणारी, राष्ट्रीय एकात्मता जपणारी भावी पिढी भारतात जन्माला यावी हे कवीचे स्वप्न आहे. | |
| | २. | सैनिक आपल्या देशाच्या सीमेवर अहोरात्र तैनात राहून पहारा देतात. येणाऱ्या शत्रूचा मुकाबला करण्यासाठी डोळ्यात तेल घालून नजर ठेवतात. प्रसंगी प्राणांची बाजी लावून देशाचे रक्षण करतात. ते युद्धाची झळ भारतीय जनतेपर्यंत पोहोचू देत नाहीत. केवळ सैनिक सीमेवर जागत असतो म्हणून आपण सुरक्षित असतो, ह्या शब्दांत कवयित्री सैनिकांविषयीचा आदरभाव दाखवतात. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३. | कवयित्री इंदिरा संत देशाच्या रक्षणासाठी सीमेवर सतत सुसज्ज रहाणाऱ्या जवानांबद्दलच्या देशवासियांच्या भावना, त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त करतात. सैनिकांच्या लढाऊवृत्तीविषयी, त्यांच्या जिद्दीविषयी, समोर मृत्यू दिसत असतानाही ना डगमगता तोफांचा, बंदुकीच्या गोळ्यांचा भडिमार होत असतानाही जराही न घाबरता पुढे पडणाऱ्या सैनिकांच्या पावलांबद्दल अभिमानाने बोलताना कवयित्री थकत नाहीत. | |
| | | **टीप - मुलांनी स्वतःच्या शब्दांमध्ये, स्वतःच्या विचारांनी उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांचे विचार (सकारात्मक/नकारात्मक) ग्राह्य धरले जावेत.** | |
| **प्र.३.** | **ब.** | **खालील पद्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. ( कोणतेही १)** | **3** |
| | १. | **<u>संदर्भ-</u>** स्वप्न करू साकार- कवी किशोर पाठक- नवीन युगातील नव्या पिढीच्या मदतीने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न कवी पाहत आहे.<br>**<u>स्पष्टीकरण-</u>** नवी पिढी, नवयुवक, विज्ञान, तंत्रज्ञानाचा जोडीने श्रमांच्या आधारे अनेक उद्योगधंदे, व्यवसाय वाढवून देशात औद्योगिक उत्क्रांती घडवून आणणार आहेत आणि पूर्ण जगाला भारताचा उज्ज्वल विकास दाखवून देणार आहेत. | |
| | २. | **<u>संदर्भ-</u>** औक्षण - कवयित्री - इंदिरा संत. सीमेवर लढणाऱ्या, प्रसंगी प्राणांची बाजी लावणाऱ्या सैनिकांप्रति देशवासियांना वाटणारा आदरभाव कवयित्रींनी व्यक्त केला आहे.<br>**<u>स्पष्टीकरण-</u>** देशाचे प्राणपणाने रक्षण करणाऱ्या सीमेवरील जवानांविषयी सर्व जनतेला वाटणारी कृतज्ञता व्यक्त करताना कवयित्री इंदिरा संत म्हणतात, 'प्रत्येक भारतीयांचे डोळे तुझा विजय बघायला आसुसले आहेत. तुझा पराक्रम पाहून सर्वांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले आहेत. या असंख्य अश्रूंच्या ज्योतींनी तुला आम्ही औक्षण करून तुझ्यासाठी यश चिंतत आहोत.' | |
| **प्र.३.** | **क.** | **खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ५०-६० शब्दांत उत्तर लिहा**. | **3** |
| | १. | व्युत्पत्ती कोशाचे कार्य - १) शब्दाचे मूळ रूप दाखवणे.<br>२) अर्थांमधील बदल स्पष्ट करणे<br>३) उच्चारातील बदल व फरक दाखवणे.<br>४) बदलांचे कारण स्पष्ट करणे.<br>५) एका शब्दाचे विविध भाषांमधील कोणते अर्थ होतात ते जाणून घेणे.<br>६) एका शब्दांचे अनेक अर्थ जाणून घेणे.. | |
| | २. | काळानुसार भाषेत बदल होतात-<br>उदा. 'शहाणा' शब्दाचा पूर्वीचा अर्थ - हुशार, बुद्धिमान, चलाख असा होतो पण आता मूळ अर्थाशिवाय 'अतिशहाणा' असा सुद्धा रूढ होत आहे. काळानुसार, नवीन तंत्रज्ञानानुसार नवनवीन शब्द भाषेत रूढ होतात. उदा. संगणक, मोबाईल इ. | |
| **प्र.४** | **अ.** | **कंसातील सूचनांनुसार उत्तरे द्या**. **(कोणतेही १)** | **2** |
| | १. | सामान्य नाम - काका<br>काकू अभिषेकच्या मागे धावत गेली/गेल्या. | |
| | २. | राघवला कामासाठी घर सोडावे लागले <u>म्हणून</u> त्याला खूप वाईट वाटले. | |
| | ३. | राजा - सामान्य नाम<br>कीर्ती - भाववाचक नाम | |
| **प्र.४** | **ब.** | **कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा**. **(कोणतेही १)** | **2** |
| | १. | **भूतकाळ,** अक्षर कुलुपावरची अक्षरे उजेडात दिसतात/दिसत आहेत. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | २. | **भूतकाळ,** नाटक सकाळी पाच वाजता आटपेल. | |
| | ३. | **वर्तमानकाळ,** मला निसर्ग ही एक कविताच वाटायची/वाटत होती. | |
| **प्र.४** | **क.** | **कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा . (कोणतेही १)** | **2** |
| | १. | **आज्ञार्थी वाक्य,** उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करावा/ केला पाहिजे. | |
| | २. | **विधानार्थी होकारात्मक वाक्य,** पाचशे रुपये ही काही लहान/ छोटी रक्कम नाही. | |
| | ३. | **विधानार्थी नकारात्मक वाक्य,** शाळेची ही वेळ आमच्या गैरसोयीची आहे. | |
| | ४. | **विधानार्थी वाक्य,** तुम्ही डोळे मिटाल का ? | |
| **प्र.४** | **ड.** | **खालील सामासिक शब्दांचा योग्य विग्रह करून समास ओळखा. (कोणतेही १)** | **2** |
| | १. | न्यायान्याय - न्याय किंवा अन्याय - वैकल्पिक द्वंद्व समास | |
| | २. | पदोपदी - प्रत्येक पदावर - अव्ययीभाव समास | |
| | ३. | पंचारती - पाच आरतींचा समूह - द्विगू समास | |
| | | **टीप - व्याकरणातील सर्व प्रश्नांमध्ये दिलेल्या प्रत्येक सूचनांसाठी प्रत्येकी (१) गुण. उदा. शब्दांची जात ओळखणे (१गुण) सांगितलेल्या सूचनेप्रमाणे बदल करणे (१गुण) सामासिक शब्दांचा विग्रह (१गुण) समास ओळखणे (१गुण)** | |
| **प्र. ५** | | **खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा (लिफाफा आवश्यक)** | **5** |
| | | पत्र लेखनासाठी आवश्यक बाबी - | |
| | | • दिनांक पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा.(उदा. ५ जून २०२१) **(०.५गुण)** | |
| | | • मायना - ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे अभिवादनासह संबोधित करावे. **(१ गुण)** | |
| | | • विषय - मोजक्या शब्दात असावा. **(०.५गुण)** | |
| | | • मजकूर - मजकूर विषयाशी संबंधित त्रोटक व नेमका असावा, समर्पक, मुद्देसूद रचना असावी, पाल्हाळ नसावा, भाषा व्यावहारीक व भारदस्त असावी. **(१.५ गुण)** | |
| | | • शेवट व स्वाक्षरी - पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पत्र पाठवणाऱ्याची नाव / स्वाक्षरी व पत्ता असावा. **(०.५गुण)** | |
| | | • टीप - लिफाफा आवश्यक **(१ गुण)** | |